महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे

Rs.2/-

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

शनिवार ■ ३१ मे २०२५ ■ वर्ष - सहावे ■ अंक ३३२ ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पत्रकार हवे आहेत


दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता करिता खालील ठिकाणी पत्रकार नियुक्त करणे आहे. इच्छुकांनी संपर्क करावा

• मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर • बोईसर • वसई • विरार • भाईंदर • पनवेल • वाडा • बदलापूर • शहापूर • आसनगाव • भिवंडी • कसारा • कर्जत • सरळगाव • म्हसा • धसई • अंबरनाथ • विठ्ठलवाडी • उल्हासनगर • टिटवाळा • शहाड • कोनगाव • आंबिवली • दिवा • कळवा

दैनिक 'ठाणे जीवनदीप वार्ता'
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.)
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८/९०८२६ ६४७८१
E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com

# नामांतर केलेल्या स्थानकांची नावे त्वरित बदला

## खा. नरेश म्हस्के यांचे रेल्वे महाव्यवस्थापकांना पत्र



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : महायुती सरकारने राज्यातील संभाजीनगर, धाराशिव, अहिल्यानगर या तीन ऐतिहासिक शहरांचे नामांतर केले आहे. मात्र अद्यापही रेल्वेच्या कामकाजात जुन्या नावांचा वापर केला जात आहे. डिजिटल प्लॅटफॉर्म आणि अॅप्सवर नवीन स्थानकांची नावे तसेच कोड बदलण्याची सूचना ठाणे लोकसभेचे खासदार, रेल्वे सल्लागार समितीचे सदस्य नरेश म्हस्के यांनी मध्य रेल्वेचे महाप्रबंधक यांना पत्राद्वारे केली आहे. महाराष्ट्र शासनाने ऐतिहासिक आणि सांस्कृतिक महत्त्व लक्षात घेऊन









राज्यातील तीन शहरांची नावे बदलली. त्यानुसार रेल्वे स्थानकांचे कोड, डिजिटल प्लॅटफॉर्म, रेल्वे अॅप्स आणि संबंधित सर्व प्रणालींमध्ये ही नवीन नावे देखील बदलण्याची गरज असल्याचे खासदार नरेश म्हस्के यांनी रेल्वे अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून दिले आहे.

औरंगाबादचे संभाजीनगर (Aurangabad स्टेशन कोड : AWB) नवीन नाव : संभाजीनगर (Sambhajinagar); उस्मानाबादचे (Osmanabad, स्टेशन कोड: UMD) नवीन नाव : धाराशिव (Dharashiv); अहमदनगरचे (Ahmednagar स्टेशन कोड : ANG) नवीन नाव : अहिल्यानगर (Ahilyanagar) या बदलांचा समावेश करण्यात यावा.

रेल्वेच्या डिजिटल प्लॅटफॉर्मवर (उदा. IRCTC अॅप, वेबसाइट, तिकीट बुकिंग सिस्टम इत्यादी) ही नावे आणि कोड अजूनही जुन्याच स्वरूपात दिसत आहेत. यामुळे प्रवाशांचा गोंधळ उडत असून नवीन नावांचा स्वीकार करण्यात अडचणी येत आहेत. तरी वरील नावे आणि त्यांचे स्टेशन कोड रेल्वेच्या सर्व डिजिटल प्लॅटफॉर्मवर तात्काळ अद्ययावत करण्याकरिता संबंधितांना द्याव्यात, यामुळे महाराष्ट्रातील प्रवाशांना सुविधा होईल तसेच राज्य सरकाच्या निर्णयाची अंमलबजावणी प्रभावीपणे होईल, अशी सूचना खासदार नरेश म्हस्के यांनी केली आहे.

# बदलापूर - कांजूरमार्ग मेट्रोच्या निविदा प्रसिद्ध

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी मेट्रोचा शब्द पूर्ण केला | आमदार किसन कथोरे यांच्या मागणीला यश

**बदलापूर** : कांजूर मार्ग ते बदलापूर मेट्रो प्रकल्पाला राज्य शासनाने हिरवा कंदील दाखविल्यानंतर एम एम आर डी एन ए या संदर्भातील निविदा प्रसिद्ध केल्या आहेत. 38 किलोमीटर लांबीच्या सर्वात मोठ्या मेट्रो प्रकल्पासाठी पीपीपी तत्त्वावर या निविदा जाहीर करण्यात आल्या आहेत. निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर पाच वर्षाच्या कालावधीत या मेट्रोचे काम पूर्ण होणे अपेक्षित आहे. बदलापूर ते कांजूरमार्ग मेट्रो व्हावी यासाठी स्थानिक आमदार किसन कथोरे हे गेल्या दहा वर्षाहून अधिक काळ प्रयत्नशील होते. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या 2019 च्या काळात या मेट्रो मार्गाच्या डीपीआर ला मंजुरी देण्यात आली होती. मात्र दरम्यानच्या काळात युतीचे सरकार गेल्यानंतर हा प्रकल्प खोळंबला होता. फेब्रुवारी महिन्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बदलापूर येथे आले असता त्यांनी आमदार किसन कथोरे यांच्या मेट्रो 14 च्या मागणीबाबत सकारात्मक भूमिका घेत लवकरच ही मेट्रोचे मंजुरी देण्याचे आश्वासन दिले होते. त्यानुसार या मेट्रोच्या कामाला गेल्या तीन महिन्यात मिळालेल्या गती नंतर मेट्रो 14 च्या निविदा प्रसिद्ध झाल्या आहेत. त्यामुळे भविष्यात बदलापूरकरांचे मेट्रोचे स्वप्न पूर्ण होणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेला शब्द पूर्ण केल्याबद्दल आमदार किसन कथोरे यांनी देवेंद्र फडणीस यांचे आभार व्यक्त करत एमएमआरडीएने तांत्रिक बाबी पूर्ण करून या कामाला लवकरात लवकर सुरुवात करण्याची मागणी यांनी केली आहे.

कांजूरमार्ग ते बदलापूर या दरम्यान 38 किलोमीटरच्या मार्गावर 15 स्टेशन्स असणार असून हा मार्ग मुंबई, नवी मुंबई, कल्याण, ठाणे आदी भागात विस्तारलेल्या मेट्रोला जोडणार असल्यामुळे बदलापूरकरांना पूर्व उपनगरी पश्चिम उपनगरे यासह नवी मुंबई आणि ठाण्याचीही कनेक्टिव्हिटी वाढणार आहे.



> बदलापूर नगरपालिकेने यापूर्वीच एम एम आर डी ए च्या मेट्रो कार शेड साठी 55 एकर जागा देण्याचा ठराव मंजूर केला आहे. त्यामुळे भविष्यात मेट्रो कारशेड बदलापुरात झाल्यास बदलापूरकरांना याचा दुहेरी फायदा होऊ शकतो. बदलापुरात रेल्वे सेवेवर होत असलेला ताण आणि दिवसेंदिवस शहराची वाढणारी लोकसंख्या यामुळे मेट्रो ही पुढील काळात बदलापूरच भवितव्य आणखीन उज्ज्वल करणारी ठरेल
>
> ■ आमदार किसन कथोरे

# बोगस डॉक्टरांवर केडीएमसीची कारवाई

## अवैधरित्या व्यवसाय करणाऱ्या डॉक्टरांवर गुन्हे दाखल

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

डोंबिवली : कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या वतीने दोन बोगस डॉक्टरांवर कारवाई करण्यात आली आहे. डॉ. देवेंद्र पुजारी व डॉ. श्रीकृष्ण कुमावत अशी दोघांची नावे आहेत. यातील कुमावत यांच्याकडे कोणतेही वैद्यकीय व्यवसाय करण्याची पात्रता नाही, तर पुजारी यांच्याकडे इलेक्ट्रो होमिओपॅथी ही शैक्षणिक अहर्ता आहे. ही मान्यता प्राप्त चिकित्सापद्धती नाही. हे दोघेही अवैधरित्या वैद्यकीय व्यवसाय करत असल्याचे आढळून आल्याने पालिकेच्या आरोग्य विभागाने विठ्ठल वाडी पोलीस ठाण्यात दोघांच्या विरोधात तक्रार दाखल केली. दाखल तक्रारीनुसार पोलिसांनी गुन्हा नोंद करत तपास सुरू केला आहे.

केडीएमसीचे वैद्यकीय अधिकारी डॉ. समीर सरवणकर यांच्या तक्रारीवरून या दोन्ही डॉक्टरांविरुध्द भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम ३१८, ३१९ सह वैद्यकीय अधिनियम १९६१ च्या कलमाने गुन्हा दाखल केला आहे. एका जागरूक डॉक्टरने डॉ. कुमावत, डॉ. पुजारी यांच्या विरुध्द दोन वर्षापूर्वी कल्याण डोंबिवली पालिकेकडे तक्रारी केल्या होत्या.

### कुमावत, पुजारी यांच्याविरुद्ध दोन वर्षांपूर्वी तक्रारी

केडीएमसीचे वैद्यकीय अधिकारी डॉ. समीर सरवणकर यांच्या प्राथमिक तपासणी अहवालानुसार, पालिकेच्या वतीने बोगस डॉक्टर शोधमोहीम राबविण्यात येत होती. फेब्रुवारी २०२४ मध्ये उल्हासनगरमधील माणेरे गावातील साई क्लिनिक येथे पथक गेले होते. त्या वेळी तेथे अवैधरित्या वैद्यकीय व्यवसाय करत असल्याचे प्रथमदर्शनी आढळून आल्याने श्रीकृष्ण कुमावत व देवेंद्र पुजारी यांच्याविरोधात विठ्ठलवाडी पोलिस स्थानकात तक्रार दाखल केली आहे. कुमावत यांच्याकडे वैद्यकीय व्यवसायासाठी कोणतीही शैक्षणिक पात्रता नाही, तर पुजारी यांच्याकडे इलेक्ट्रो होमिओपॅथी अशी शैक्षणिक अर्हता आहे. तथापि इलेक्ट्रो होमिओपॅथी ही मान्यताप्राप्त चिकित्सापद्धती नसल्याने व या पद्धतीतील अर्हताधारकांचे कोणत्याही वैद्यकीय परिषदेकडे नोंदणी होऊ शकत नसल्यामुळे असे व्यावसायिक अनधिकृत ठरतात. त्यामुळे दोन्ही व्यक्तींवर महाराष्ट्र वैद्यकीय व्यवसाय अधिनियम १९६१ मधील कलम ३३ व ३६ तसेच भारतीय न्यायसंहिता कायदा २०२३ चे कलम ३१८ व ३१९ अंतर्गत गुन्हा नोंदवण्यात आला आहे. याप्रकरणी विठ्ठलवाडी पोलिस ठाणे यांच्यामार्फत अधिक तपास करण्यात येत आहे, अशी माहिती पालिकेच्या आरोग्य विभागाने दिली.



## गीतासार



### अध्याय १२
### भक्तियोगः

क्लेशोऽधिक तरस्तेषाम व्यक्तासक्त चेतसाम् ॥ अव्यक्ता हि गतिर्दुःखं देहवद्भिरवाप्यते ॥ १२-५ ॥

सच्चिदानंदघन निराकार ब्रह्मांत चित्त गुंतलेल्या त्या पुरुषांच्या साधनांत कष्ट जास्त आहेत. कारण देहाचा अभिमान असणाऱ्यांकडून अव्यक्त ब्रह्माची प्राप्ती कष्टानेच होत असते. ॥ १२-५ ॥

ये तु सर्वाणि कर्माणि मयि संन्यस्य मत्पराः । अनन्येनैव योगेन मां ध्यायन्त उपासते ॥ १२-६ ॥

परंतु जे मत्परायण भक्तजन सर्व कर्मे माझ्या ठिकाणी अर्पण करून मज सगुणरूप परमेश्वराचीच अनन्य भक्तियोगाने निरंतर चिंतन करीत उपासना करतात ॥ १२-६ ॥

तेषामहं समुद्धर्ता मृत्युसंसारसागरात् । भवामि नचिरात्पार्थ मय्यावेशितचेतसाम् ॥ १२-७ ॥

हे पार्था (अर्थात पृथापुत्र अर्जुना), त्या माझ्यात चित्त गुंतवलेल्या प्रेमी भक्तांचा मी तत्काळ मृत्युरूप संसारसागरातून उद्धार करणारा होतो. ॥ १२-७ ॥

मय्येव मन आधत्स्व मयि बुद्धिं निवेशय । निवसिष्यसि मय्येव अत ऊर्ध्वं न संशयः ॥ १२-८ ॥

माझ्यातच मन ठेव. माझ्या ठिकाणीच बुद्धी स्थापन कर. म्हणजे मग तू माझ्यातच राहशील, यात मुळीच संशय नाही. ॥ १२-८ ॥

अथ चित्तं समाधातुं न शक्नोषि मयि स्थिरम् । अभ्यासयोगेन ततो मामिच्छाप्तुं धनञ्जय ॥ १२-९ ॥

जर तू माझ्यात मन निश्चल ठेवायला समर्थ नसशील, तर हे धनंजया (अर्थात अर्जुना), अभ्यासरूप योगाने मला प्राप्त होण्याची इच्छा कर. ॥ १२-९ ॥

## रेसिपी
## केळीचे कटलेट



साहित्य- कच्चे केळे-चार तुकडे उकडलेले ,मटार -एक वाटी ,मैदा- १/३ कप ,भाजलेले जिरे- एक टीस्पून ,हिरवी मिरची-तीन ,तिखट-एक टीस्पून ,काळे मीठ- अर्धा टीस्पून, ब्रेडक्रम्स ,तेल चवीनुसार मीठ

कृती- सर्वात आधी एका भांड्यात केळी, मटार आणि पीठ घाला आणि ते चांगले मॅश करा. यानंतर, त्यात इतर सर्व मसाले घाला आणि चांगले मिसळा.आता या मिश्रणाचे छोटे गोळे बनवा. नंतर त्यांना तुमच्या हाताच्या तळव्याच्या मदतीने इच्छित आकारात सपाट करा आणि ब्रेडक्रंबमध्ये चांगले गुंडाळा.आता एका पॅनमध्ये तेल घालून ते गरम करा. तेल गरम झाल्यावर, हे कटलेट मंद आचेवर हलके तपकिरी होईपर्यंत तळा. तयार कटलेटएका प्लेटमध्ये काढा आणि टोमॅटो सॉस किंवा चटणीसोबत गरम नक्कीच सर्व्ह करा.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर

आज ३१ मे, आज पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची ३०० वी जयंती. ३०० वर्षांपूर्वी आजच्याच दिवशी म्हणजे ३१ मे १७२५ रोजी अहमदनगर जिल्ह्यातील जामखेड तालुक्यातील चोंडी या गावी माणकोजी व सुशिलाबाई शिंदे या दाम्पत्यापोटी अहिल्यादेविंचा जन्म झाला. अतिशय छोट्या आणि सामान्य कुटूंबात जन्मलेल्या अहिल्यादेवी यांनी इतिहासात मानाचे स्थान प्राप्त केले आहे. ज्या काळात स्त्रियांना शिक्षणास बंदी होती, चूल आणि मूल हेच स्त्रियांचे जीवन होते, स्त्रियांनी घराचा उंबरठा ओलांडणे म्हणजे पाप समजले जात त्याकाळात त्यांच्या वडिलांनी त्यांना लिहायला, वाचायला शिकवले. मराठ्यांच्या इतिहासातील पराक्रमी समजल्या जाणाऱ्या होळकर घराण्यातील सुभेदार खंडेराव होळकर यांच्याशी वयाच्या आठव्या वर्षी त्यांचा विवाह झाला. खंडेरावांपासून त्यांना मालेराव आणि मुक्ताबाई अशी दोन अपत्ये झाली. पण वयाच्या अवघ्या २८ व्या वर्षी त्यांना वैधव्यास सामोरे जावे लागले. पती खंडेराव हे कुंभेरीच्या लढाईत धारातीर्थी पडल्यावर त्यावेळच्या सनातनी लोकांनी त्यांच्यावर सती जाण्यासाठी दबाव आणला पण सासरे सरदार मल्हारराव होळकर यांनी या अमानवी, सनातनी परंपरेला विरोध करून अहिल्यादेवींना सती जाण्यापासून परावृत्त केले. आपल्या सासऱ्यांच्या इच्छेनुसार त्यांनी सती जाण्याचा विचार सोडून दिला. अहिल्यादेवींची राजकीय कारकीर्द तेंव्हापासूनच सुरू झाली. खंडेरावांची जागा अहील्यादेवींनी घेतली. मल्हारराव देशभर मोहिमांवर व्यस्त असत त्यावेळी मल्हारराव आणि अहिल्यादेवींमध्ये पत्रव्यवहार होत. सासरा - सुनेमधील पत्रव्यवहार हा अहिल्यादेवींच्या राजकीय विचारकतेचा उत्कृष्ट नमुना होय. मोहीमेवर असताना मल्हारराव प्रजा रक्षणाच्या सूचना अहिल्यादेवींना जसे देताना दिसतात तसेच अहिल्यादेवी आपल्या सासऱ्यांना देताना दिसतात. सासरा सुनेचे ऐकल असा तो काळ नव्हता....आता ही नाही...पण मल्हाररावांसारखा मुत्सद्दी अहिल्यादेवींचा सल्ला अंमलात आणत यावरुनच अहिल्यादेवींची योग्यता लक्षात येते. मल्हारराव मोहिमेवर असत तेंव्हा स्वतः अहिल्यादेवी राज्याचा बंदोबस्त चोख राखीत. मल्हाररावांच्या



सूचनेप्रमाणे त्या कारभार करीत. १७६६ साली मल्हाररावांचे वृद्धापकाळाने निधन झाले. दरम्यानच्या काळात अहिल्यादेवींनी स्त्रियांना लष्करी प्रशिक्षण देणारे महाविद्यालय सुरू केले. ज्या काळात स्त्रियांना घराबाहेर पडायला बंदी होती त्याकाळात त्यांनी स्वतःची ५०० महिलांची पलटण उभी केली. अहिल्यादेवींचे प्रशासन ब्रिटिशांनाही आदर्शभूत ठरले. सर्व देशात जेंव्हा दांडगाईचे राज्य होते, कोणाचा कोणाला पायपोस नव्हता त्याकाळात सुरळीत चालणारे एकमेव राज्य म्हणजे अहिल्यादेवींचे राज्य. अहिल्यादेवी या दानशूर, कर्तृत्वत्वान, धर्मपारायण व कार्यक्षम राज्यकर्त्या म्हणून ओळखल्या जात असल्या तरी त्यांची राज्यकारभारावर प्रशासकीय पकड घट्ट होती. त्यांच्या वडिलांनी लहानपणी दिलेल्या शिकवणुकीचा आणि सासरे मल्हारराव यांनी दिलेल्या राजकीय कारभाराच्या तालमीचा त्यांना उपयोग झाला. त्या सामान्य कुटुंबातील असल्यामुळे त्यांना प्रजेच्या अडीअडचणीची जाणीव होती. त्यांचे राहणे अतिशय साधे व सात्विक होते म्हणूनच त्यांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर असे नाव पडले. अहिल्यादेवींनी देशभर भ्रमंती केली. देशभ्रमण करताना तिर्थक्षेत्रांच्या जागी त्यांनी धर्मशाळा बांधल्या. शेकडो मंदिरांचा जिर्णोद्धार केला. जवळपास २८ वर्ष त्यांनी राज्यकारभाराचा गाडा सैन्याच्या सहकार्याने अतिशय कुशलपणे चालवला. कोणतेही कर्ज न काढता राज्याची तिजोरी भक्कम करून त्यांनी प्रजाहिताकडे लक्ष दिले. आदर्श राज्यकारभार कसा करावा याचा वस्तुपाठच अहिल्यादेवींनी घालून दिला. अहिल्यादेवी होळकर हे नाव इतिहासात अमर झाले. बाई काय राज्यकारभार करणार ही सनातनी अटकळ त्यांनी खोटी ठरवली. १३ ऑगस्ट १७९५ रोजी अहिल्यादेवींचे निधन झाले. प्रजाहितदक्ष, आदर्श राजकर्ती म्हणून इतिहासात अजरामर झालेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

- श्याम ठाणेदार,दौंड
जिल्हा पुणे

# सेवानिवृत्त मुख्याध्यापकांचे अधिवेशन संपन्न

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : महाराष्ट्र राज्य सेवानिवृत्त मुख्याध्यापक महामंडळाचे राज्यस्तरीय पहिले अधिवेशन स्नेहसंमेलन पन्हाळा - कोल्हापूर येथे नुकतेच संजीवन नॉलेज सिटी, सोमवार पेठ येथे अत्यंत उत्साहात पार पडले. स्नेहसंमेलनाचे उद्घाटन शिक्षक आमदार आसगावकर यांच्या शुभहस्ते झाले.अध्यक्षस्थानी महामंडळाचे संस्थापक अध्यक्ष अरुण थोरात होते.तर अधिवेशन अध्यक्षस्थानी महामंडळाचे अध्यक्ष सुभाष माने होते यावेळी प्रमुख अतिथी प्राचार्य एन. आर. भोसले,डॉ. विलास पाटील प्रा. पी. आर. भोसले, महामंडळाचे कार्याध्यक्ष डी.एस.पाटील,सचिव आदिनाथ थोरात, सहसचिव डॉ.श्रीकांत पाटील एम. के. आवळेकर,प्रा. अरविंद मानकर, तानाजी माने, नंदकुमार सागर,आर. वाय.पाटील आदि मान्यवर उपस्थित होते.

दीप प्रज्वलन,इशस्तवन, स्वागत गीता नंतर प्राचार्य एन.आर.भोसले यांनी प्रास्ताविक केले.पहुण्यांच्या स्वागता नंतर उद्घाटक आमदार जयंत आसगावकर यांनी मौलिक मार्गदर्शन केले.यावेळी प्रा.मानकर यांनी म्युझिक थेरपी विषयी मनोरंजक मार्गदर्शन केले.यावेळी राज्य महामंडळाचे पदाधिकारी व कार्यकारिणी सदस्यांचा सत्कार करण्यात आला.रायगडचे अध्यक्ष व महामंडळाचे सहसचिव डॉ.श्रीकांत पाटील येताच "छत्रपती शिवाजी महाराजांचा रायगड पन्हाळ्याच्या भेटीला आला...!!! " असे निवेदकांनी उद्गार काढताच संपूर्ण सभागृह भावनावश झाले.यावेळी श्रीकांत पाटील यांचा यथोचित सन्मान करण्यात आला.दुपारनंतर "खेळ पैठणीचा" हा अत्यंत मनोरंजक कार्यक्रम घेण्यात आला.यात जवळपास शंभर सेवानिवृत्त मुख्याध्यापक बंधू-भगिनींनी भाग घेतला. यानंतर हास्यकल्लोळ फेम अजितकुमार कोष्टी यांचा अतिशय मनोरंजक असा कार्यक्रम घेण्यात आला ज्यामुळे प्रेक्षकांत हास्याचे कारंजे फुटले. तसेच व्याख्यान व खुले अधिवेशन घेण्यात आले.यावेळी महामंडळाचे सचिव आदिनाथ थोरात यांनी सर्वांचे आभार मानले. या पहिल्याच राज्यस्तरीय अधिवेशन स्नेहसंमेलनात जवळपास एक हजार सेवानिवृत्त मुख्याध्यापक बंधू भगिनींनी सहभाग नोंदविला.संपूर्ण कार्यक्रमाचे उत्कृष्ट निवेदन उत्कृष्ट निवेदक एम.सी.कुळकर्णी यांनी केले.

# तळागाळातील लोकांना मदत करणे हाच एकमेव उद्देश - दयानंद चोरघे

### डी.वाय.फाऊंडेशन च्या माध्यमातून १० वी १२ वी च्या गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा मोठ्या थाटामाटात संपन्न!

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : डि.वाय.फाऊंडेशन महाराष्ट्र राज्य या संस्थेचे संस्थापक अध्यक्ष, तरुणांचे आधारवड तथा भारतीय काँग्रेस कमिटीचे ठाणे जिल्हा ग्रामीण जिल्हाध्यक्ष . दयानंद चोरघे यांच्या संकल्पनेतून गेल्या १४ वर्षापासून अखंडितपणे ठाणे, पालघर ,रायगड जिल्ह्यासह संपूर्ण महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात डी.वाय.फाऊंडेशन च्या माध्यमातून अनेक उपक्रम साजरी केले जातात. त्यामध्ये शालेय विद्यार्थ्यांना मोफत वह्या व शैक्षणिक साहित्य वाटप,गणवेश वाटप,छत्री वाटप, शासकीय दाखले वाटप, आरोग्य शिबिर, नेत्र चिकित्सा शिबिर , संगणक कक्ष, शिलाई मशीन वाटप, तसेच प्रशिक्षण केंद्र,साड्या वाटप,ब्लँकेट वाटप, करियर मार्गदर्शन शिबिर, त्यामुळे संपूर्ण महाराष्ट्रात प्रत्येक जिल्ह्यासह तालुक्यात देखील डी.वाय. फाऊंडेशनचे हजारो कार्यकर्ते असल्याचे संस्थापक अध्यक्ष श्री. दयानंद मोतीराम चोरघे यांनी प्रत्यक्ष दैनिक स्वराज्य बोलताना सांगितले. आज जगातून माणुसकी हरवत चाललेली आहे प्रत्येकाने माणुसकी जपली पाहिजे माणुसकी जपण्यातच खरं सुख आहे इतरांच्या आनंदातच आपला आनंद शोधणे तळागाळातील लोकांना मदत करणे त्यांच्या समस्या जाणून घेऊन त्या सोडवणे, आनंदाचे क्षण सर्वांन सोबत साजरी करणे, आपण आनंदी तर आहोतच पण आपल्यामुळे इतरही कसे आनंदी राहतील यासाठी डी.वाय.फाऊंडेशन महाराष्ट्र राज्य या संस्थेचे संस्थापक



अध्यक्ष, तरुणांचे आधारवड तथा भारतीय काँग्रेस कमिटीचे ठाणे जिल्हा ग्रामीण जिल्हाध्यक्ष श्री. दयानंद मोतीराम चोरघे सतत प्रयत्नशील असतात. म्हणून २८ मे २०२६ रोजी डी.वाय.फाऊंडेशन या संस्थेचा १५ वा वर्धापन दिन व दयानंद चोरघे यांच्या लग्नाचा २८ व्या वाढदिवस सोहळयाचे औचित्य साधून दरवर्षीप्रमाणे यावर्षी देखील आमणे-लोनाड रांजणोली पिंपळास व सरवली परिसरातील दहावी बारावीच्या 350 गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा त्याचबरोबर या विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन प्रवेश घेण्यासाठी लागणारे सर्व प्रकारचे शासकीय दाखले तसेच ज्येष्ठ नागरिकांसह विद्यार्थ्यांसाठी आधार कार्ड व पॅन कार्ड शिबिर त्याचप्रमाणे रक्तदान शिबिराचे आयोजन जैन रियालीटी डी.वाय. फाउंडेशन मध्यवर्ती जनसंपर्क कार्यालय बापगाव नाका कल्याण पडघा रोड भिवंडी येथे करण्यात आले होते.यावेळी विशेष अतिथी म्हणून दैनिक स्वराज्य तोरणचे संपादक-डॉ.श्री.किशोर बळीराम पाटील, तलाठी सजा वडपे तलाठी श्री.गणेश पाटील, डी.वाय. फाउंडेशन महाराष्ट्र राज्याच्या प्रदेश अध्यक्षा सौ.प्रियंका दयानंद चोरघे आवर्जून उपस्थित होत्या.तर प्रमुख पाहुणे म्हणून सरपंच नादकर दत्तात्रय सुतार, सरपंच आमणे संतोष काकडे, ग्रा.प.सदस्य तुकाराम बजागे, मा.उपसरपंच आमनेपाडा योगेश जाधव, मा. ग्रा.प.सदस्य नारायण मोगरे, समाजसेवक अभिमन्यू पाटील, भरत मढवी, सरपंच नवनाथ सुतार, आदी मान्यवर सर्व प्रशासकीय अधिकारी, डी वाय फाउंडेशनचे पदाधिकारी व मोठ्या संख्येने विद्यार्थी वर्ग नागरिक उपस्थित होते.

इतरांच्या आनंदातच आपला आनंद शोधणे व तळागाळातील लोकांना मदत करणे हाच आमचा एकमेव उद्देश आहे असे डी वाय फाउंडेशनचे अध्यक्ष दयानंद चोरघे यांनी बोलतांना सांगितले.हा संपूर्ण कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी. महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस .विरेन चोरघे, डी वाय फाउंडेशनचे अध्यक्ष योगेश पाटील. उपाध्यक्ष दीपक केणे. व डी वाय फाउंडेशन चे सर्व पदाधिकारी यांनी विशेष मेहनत घेतली.या संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन मनोहर तरे यांनी केले.

# आदिवासी बांधवाना ताडपत्रीचे वाटप



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

टिटवाळा : नडगांव -दानबाव येथील आदिवासी खाकर वाडी मध्ये घराच्या छपरावर छत म्हणून ताडपत्रींचे वाटप नडगाव-दानबाव ग्रामपंचायत सरपंच अरूणा सतिश चौधरी यांच्या हस्ते व उपस्थित पाहुणे यांच्या हस्ते करण्यात आले. भागुबाई जीवन प्रेरणा सामाजिक संस्था फळेगांव यांच्या पाठपुराव्यामुळे अधिक हितेन मोटानी यांच्या प्रयत्नातून,गुंज चॅरिटेबल ट्रस्ट लोअर परेल मुंबई पश्चिम यांच्या वतीने ताडपत्री उपलब्ध करण्यात आल्या.

यावेळी सतिश चौधरी, पंकज पाटील सर, भागुबाई जीवन प्रेरणा सामाजिक संस्था फळेगांवचे अध्यक्ष संजय गोमा जाधव, कवी-गीतकार विजय तांबे ,गुंज चॅरिटेबल ट्रस्टचे पदाधिकारी हितेन मोटानी,केतन मेहता, कश्यप देसाई, रीमा शाह, पल्लवी शहा,बिंदू शहा,हेतल मोटानी यांच्या सह आदिवासी बांधव आदि उपस्थित होते.

### पेण पंचायत समितीच्या वतीने
# क्षयरोग मुक्त ग्रामपंचायत पुरस्कार सोहळा संपन्न



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : पेण पंचायत समिती कार्यालयाच्या वतीने रामवाडी येथे आज तालुक्यातील १४ ग्रामपंचायतींना क्षयरोग मुक्त ग्रामपंचायत पुरस्काराने गटविकास अधिकारी श्री.घरत यांच्या मार्गदर्शनाखाली विस्तार अधिकारी प्रसाद म्हात्रे,तालुका आरोग्य अधिकारी डॉ .नखाते आरोग्य विस्तार अधिकारी समीर सानप, समुदाय आरोग्य अधिकारी डॉ.सौ. नंदा सौदागर, आरोग्य सेवक संजय पाटील सरपंच दुरशेत दशरथ गावंड उपसरपंच सौ.शेवंती गावंड,सुनंदा गावंड तुकाराम डंगर आदि उपस्थित होते.मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.करण्यात आले.

सदर सोहळयात क्षयरोग मुक्त ग्रामपंचायतीचे सरपंच, उपसरपंच, प्रशासक, ग्रामसेवक, आरोग्य अधिकारी,कर्मचारी,आशा स्वयंसेविका, उपस्थित होते. पेण तालुक्यातील कोपर ,वरसई ,शिहू,बोरी,कुहिरे,जिर्णे उंबर्डे,गागोदे खुर्द,कामार्ली, दुरशेत,दुष्मी ,बेणसे ,मसद बुद्रुक ,आंबेघर या १४ ग्रामपंचायतींना सन्मानित करण्यात आले.

# गोरगरीबांच्या शिक्षणावर गंडांतर आणणारा सुधारित संचमान्यतेचा शासन निर्णय रद्द करावा - सुधीर घागस

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : दि.१५ मार्च २०२४ च्या शासन निर्णयानुसार सुधारित संचमान्यता आदेश शाळांना ऑनलाईन उपलब्ध करून देण्यात आले आहेत. यामुळे अनेक अनुदानित शाळा बंद पडणार असल्याने हा शासन आदेश तातडीने रद्द करून पुर्वीच्याच निकषांनुसार संचमान्यता करण्याची मागणी शिक्षण क्रांती संघटनेचे राज्य अध्यक्ष सुधीर देवराम घागस यांनी शालेय शिक्षण विभागाच्या प्रधान सचिवांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क या अधिनियमाचा चुकीचा अर्थ काढून प्राथमिक विभागाची संच मान्यता करण्यात आली आहे. त्याचबरोबर माध्यमिक विभागाकरीताही सुधारित निकष लावल्याने अनेक अनुदानित शाळा बंद पडण्याच्या मार्गावर असून मोठ्या प्रमाणात शिक्षक अतिरिक्त होणार आहेत. राज्यात शिक्षक भरतीसाठी पवित्र पोर्टल लागू केल्यामुळे अनुदानित शाळांमध्ये हजारो शिक्षकांच्या जागा रिक्त आसल्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. शिक्षणावरील खर्च वाचवण्यासाठी शासनाने जागोजागी मुबलक प्रमाणात स्वयंअर्थसहाय्यित शाळा सुरू केल्याने पालक व विद्यार्थी तिकडे आकर्षित होत आहेत. अशा काही कारणांमुळे मराठी माध्यमाच्या अनुदानित शाळांमध्ये विद्यार्थी प्रवेश घेत नाहीत. यावर उपाययोजना आखण्याऐवजी शासन जाचक निकष लावून शाळा जाणीवपूर्वक बंद पाडू पाहात आहे की काय अशी शंका निवेदनात उपस्थित केली आहे.

मराठी माध्यमाच्या शाळांना संजीवनी मिळावी व त्या वाढल्या नाहीत तरी निदान आहेत त्या तरी टिकाव्यात यासाठी शासनाने उच्च न्यायालयाने दिलेल्या २३ एप्रिल व ६ मे २०२४ च्या अंतरिम आदेशाचा संदर्भ देत १५ मार्च २०२४ चा सुधारित संच मान्यता आदेश तातडीने रद्द करावा व पुर्वीप्रमाणेच संच मान्यता आदेश उपलब्ध करून द्यावेत अशी मागणी सुधीर घागस यांनी प्रधान सचिवांकडे केली आहे.

# ठाणे पोलीस परिमंडळ ४ मध्ये 'आरोग्यम' शिबीर

### - योगाचार्य सतीश शर्मा यांचे मार्गदर्शन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

उल्हासनगर : ठाणे शहर पोलिस आयुक्तालय आणि सप्तध्यान फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने परिमंडळ 4 मधील सर्व पोलिस अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी विशेष आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.हे शिबिर आयुष मंत्रालय सर्टिफाइड योगाचार्य सतीश शर्मा यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरित्या पार पडले.'आरोग्यम' या शिबिरात योगाचार्य सतीश शर्मा यांनी ध्यान, प्राणायाम आणि योगसाधनांच्या माध्यमातून मानसिक व शारीरिक आरोग्य कसे टिकवावे, याबाबत सखोल मार्गदर्शन केले. अवस्थता, उच्च रक्तदाब, डिप्रेशन आणि मधुमेह यांसारख्या आजारांवर योगाद्वारे नियंत्रण ठेवण्याचे तंत्र त्यांनी उपस्थितांना समजावून सांगितले.

या योग शिबिराचा लाभ बदलापूर, अंबरनाथ, विठ्ठलवाडी आणि उल्हासनगर येथील परिमंडळ 4 मधील अनेक पोलीस अधिकारी आणि कर्मचारी यांनी घेतला.सुमारे दीड तास चाललेल्या या आरोग्य सत्रानंतर पोलिस प्रशासनाने योगाचार्य सतीश शर्मा यांचे मनःपूर्वक स्वागत करत त्यांचे आभार मानले.

या उपक्रमामुळे पोलिस दलात आरोग्याविषयी जागरूकता वाढली असून, भविष्यात अशा कार्यक्रमांचे आयोजन पुन्हा करण्याचा निर्धार करण्यात आला आहे.

## आजचे राशिभविष्य



मेष - तुमच्या कौटुंबिक नात्यात काही मतभेद चालू असतील तर तुम्ही दोन्ही पक्षांचे म्हणणे ऐकून ते सोडवले तर तुमच्यासाठी चांगले होईल. दिवस चांगला लाभ घेऊन येणार आहे.

वृषभ -तुमच्या मनात चाललेल्या गोष्टी कोणाशीही शेअर करणे टाळावे लागेल अन्यथा ती व्यक्ती त्यांचा गैरफायदा घेऊ शकते. कुटुंबातील सदस्याकडून तुम्हाला चांगली बातमी ऐकायला मिळेल.

मिथुन -कोणतेही नवीन काम सुरू करण्यापूर्वी तुमच्या पालकांचा आशीर्वाद घ्या. तुमच्या आजूबाजूला होणाऱ्या कोणत्याही वादात तुम्ही अडकू नका.

कर्क - तुम्ही तुमच्या कामाने जॉबच्या ठिकाणी तुमच्या वरिष्ठांना खूश कराल ज्यामुळे तुम्हाला नवीन पद मिळू शकते.

सिंह - तुमच्या आरोग्यात काही बिघाड असेल तर त्याकडे अजिबात दुर्लक्ष करू नका अन्यथा ते तुमच्यासाठी त्रासदायक ठरू शकते. रखडलेले काम पूर्ण होऊ शकते.

कन्या - बँकिंग क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांच्या कारकिर्दीत आज पदोन्नती दिसेल. व्यवसाय करणाऱ्या लोकांसाठी आजचा दिवस थोडा कमकुवत राहणार आहे.

तूळ - तुम्ही भागीदारीत कोणताही व्यवसाय करण्याचा विचार करत असाल तर तो अजिबात करू नका तो भागीदार तुमची फसवणूक करू शकतो.


वृश्चिक - नोकरीत तुमच्या बढतीमुळे कौटुंबिक वातावरण आनंददायी असेल आणि एक छोटी पार्टी देखील आयोजित केली जाऊ शकते.

धनु -तुमच्या दैनंदिन गरजांसाठी खरेदी करण्यासाठी तुम्ही आज पैसे खर्च कराल. तुम्ही भविष्यातील योजनांमध्येही गुंतवणूक करू शकता.उधार दिले पैसे तुम्हाला आज परत मिळू शकतात.

मकर -तुमच्या वाढत्या खर्चावर नियंत्रण ठेवून तुम्ही भविष्यासाठी काही पैसे वाचवण्याची योजना आखू शकता. तुम्हाला तुमच्या आरोग्याबद्दल जागरूक राहावे लागेल.

कुंभ - कामाच्या ठिकाणी तुमच्या निर्णय क्षमतेचा तुम्ही पूर्ण फायदा घ्याल. नोकरीच्या शोधात असलेल्या लोकांना एखादी चांगली बातमी ऐकायला मिळू शकते.

मीन - मुलाच्या लग्नाशी संबंधित कोणतीही अडचण तुम्हाला त्रास देत असेल तर कुटुंबातील सदस्याच्या मदतीने सोडवू शकाल.









केंद्र सरकारच्या हवाई वाहतूक मंत्र्यांबरोबर बैठक घेऊन कृती समितीच्या वतीने या प्रश्नाचा पाठपुरावा केला आहे. तरीही आजपर्यंत हा प्रश्न केंद्रात प्रलंबित असल्याने प्रकल्पग्रस्तांमध्ये असंतोष पसरला आहे. या असंतोषाचा स्फोट होऊ न देता केंद्राने हा प्रश्न त्वरीत सोडवावा असे दशरथ पाटील म्हणाले. विमानतळ परिसरात नोकऱ्यांचा प्रश्न कसा सोडवायचा त्यात प्रकल्पग्रस्तांना व ठाणे, रायगड, पालघर, मुंबई येथील भुमिपुत्रांना प्राधान्य देऊन नोकरभरती करण्यासाठी प्राधान्य देणे गरजेचे असल्याचे दशरथ पाटील म्हणाले. दि. बा. पाटील यांचा स्मृतीदिन २४ जूनला आहे. या दिवशी काही भव्य कार्यक्रम आखता येईल का? यावर बैठकीत विचारविनिमय करण्यात आला. यासाठी वेगवेगळ्या भागात त्या त्या भागातील कार्यकर्त्यांनी लोकजागृती करत बैठका घ्याव्यात आणि कार्यक्रम यशस्वी करावा असे सांगण्यात आले.

# नवी मुंबई विमानतळ नामकरण स्थानिकांमध्ये नाराजी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला प्रकल्पग्रस्तांचे नेते दि.बा. पाटील यांचे नाव देण्यासंदर्भातील प्रश्न केंद्र शासनाकडे प्रलंबित असल्याने प्रकल्पग्रस्तांमध्ये असंतोष पसरला आहे. राज्य शासनाने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सोबत तातडीने दि. बा. पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सर्वपक्षीय कृती समितीच्या पदाधिकाऱ्यांची बैठक आयोजित करुन विमानतळाला नाव जाहिर करावे. तशी सूचना जारी करावी. अन्यथा असंतोषाचा स्फोट



होईल असा इशारा कृती समितीच्या वतीने अध्यक्ष दशरथ पाटील यांनी पत्रकार परिषदेत दिला.

नवी मुंबई येथील आंतरराष्ट्रीय विमानतळाला प्रकल्पग्रस्तांचे नेते दि.बा. पाटील यांचे नाव देण्यासाठी अनेक मोर्चे निघाले होते. दि. बा. पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सर्वपक्षीय कृती समितीच्या वतीने अध्यक्ष दशरथ पाटील यांच्या अध्यक्षतेखाली नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला दि.बा. पाटील यांचे नाव देणे तसेच इतर प्रश्नांबाबत विचारविनिमय करण्यासाठी ठाण्यातील शासकीय विश्रामगृह येथे जिल्ह्यातील पदाधिकाऱ्यांच्या बैठकीचे आयोजन केले होते. त्यानंतर आयोजित पत्रकार परिषदेत दशरथ पाटील बोलत होते.

बैठकीला माजी मंत्री जगन्नाथ पाटील, माजी नगराध्यक्ष जे. एम. म्हात्रे, जे. डी. तांडेल, संतोष केणे, गुलाब वझे, नितीन पाटील, डॉ. यशवंत सोरे, शरद म्हात्रे, वासुदेव भोईर, दीपक पाटील, दीपक म्हात्रे, सीमा घरत, संजय घरत, संतोष घरत, धीरज कालेकर आणि पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. लोकनेते दि. बा पाटील यांचे नाव नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला द्यावे यासाठी आजवर अनेक आंदोलने केली. त्यामुळे राज्य सरकारने त्यांच्या नावाचा ठराव महाराष्ट्र विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात मंजूर करून तो केंद्र सरकारकडे पाठविला आहे. परंतु हा ठराव केंद्रात अजूनही प्रलंबित आहे. विमानतळाचे काम आता पूर्णत्वास आले आहे. कदाचित नोव्हेंबर पासून उड्डाणाला सुरुवात होईल. अशावेळी दि. बा. पाटील यांचे नाव या विमानतळाला देणे गरजेचे आहे, असे दशरथ पाटील म्हणाले.



# अर्बन हाटकडे सिडकोची डोळेझाक

### संरक्षक भिंती कोसळू लागल्याने नागरिकांच्या जीविताला धोका

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**नवी मुंबई:** सिडकोने दोन दशकांपूर्वी कोकणभवन जवळ वसवलेल्या देखण्या अर्बन हाट अर्थात कलाग्रामची दुरवस्था झाली आहे. या अर्बन कलाग्रामच्या सभोवताली असलेल्या संरक्षक भिंती कोसळू लागल्या आहेत. त्यामुळे बेलापूर रेल्वे स्थानक तसेच सिडको मुख्यालय परिसरकाकडे जाणाऱ्या नागरिकांच्या जीविताला धोका निर्माण झाला आहे. सिडको मात्र कलाग्रामच्या या दुरवस्थेकडे डोळेझाक करत आहे.

नवी मुंबई महापालिका क्षेत्रातील जवळजवळ १५ एकर क्षेत्रावर सिडकोने हे अर्बन कलाग्रामची निर्मिती केली आहे. सिडकोने करोनानंतर या कलाग्रामला अक्षरशः टाळे ठोकले आहे. राज्यातील हजारो महिला बचत गट व अनेक हातमाग कामगार यांची ही हक्काची बाजारपेठ होती. सिडकोने निर्माण केलेले हे देखणे कलाग्राम मात्र आता अखेरच्या घटका मोजत आहे. याच ठिकाणी दरवर्षी राज्यभरातील महिलांसाठी व कलाकारांसाठी मेळे घेतले जात होते. केंद्र शासन व सिडको यांच्या माध्यमातून निर्माण झालेले हे अर्बन कलाग्राम आता अत्यंत दुर्लक्षित झाले आहे.

सिडकोने नवी मुंबई फेस्टिव्हल अंतर्गत या ठिकाणी अनेक कार्यक्रम आयोजित केले होते. त्यामुळे या कलाग्रामला सातत्याने वर्दळ पाहायला मिळत होती. परंतु आता या कलाग्रामची पूर्ण रयाच गेली आहे. सिडकोचे सुरक्षारक्षक या ठिकाणी बसलेले असतात. परंतु कलाग्राममध्ये जाताना मोठमोठे वृक्ष उन्मळून पडलेले दिसतात. विद्युत दिव्यांची दुरवस्था झाली आहे. कारंजे बेट बकाल अवस्थेत आहे. तसेच या कलाग्रामच्या संरक्षक भिंती पडू लागल्या असून बेलापूर रेल्वेस्थानकाच्या नजिकची भिंत कोसळली आहे. कलाग्रामच्या प्रवेशद्वाराकडून आग्रोळी गावाकडे जाणाऱ्या मार्गावरील संरक्षिक भिंतही पडली आहे.

# रोहित्र दुरुस्ती करताना कर्मचाऱ्यांना विजेचा शॉक

दै. ठाणे जीवनदीप वार्ता



**विरार :** विरार पश्चिमेच्या अर्नाळा धसपाडा येथे रोहित्राच्या दुरुस्तीचे काम सुरू असताना महावितरणच्या चार कर्मचाऱ्यांना विजेचा धक्का लागल्याची घटना घडली आहे. यात एका कर्मचाऱ्याचा मृत्यू झाला असून अन्य तीन जण जखमी आहेत. जयेश घरत (२८) असे मृत्यू झालेल्या तरुणाचे नाव आहे. शुक्रवारी सकाळी सव्वा नऊच्या सुमारास ही घटना घडली. विरार पश्चिमेच्या अर्नाळा धसपाडा येथे महावितरणच्या रोहित्रात तांत्रिक बिघाड झाला होता. त्यामुळे शुक्रवारी सकाळीच्या सुमारास महावितरणच्या वटार विभागाचे चार कर्मचारी दुरुस्तीसाठी रोहित्रावर चढले होते. मात्र अचानक पणे वीज प्रवाहित होऊन चौघांना विजेचा धक्का लागला. यात तीन जण बाहेर फेकले गेले तर जयेश घरत हा त्यावरच अडकून राहिल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला आहे. तर अन्य तीन जण जखमी झाल्याने त्यांना तातडीने रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.

**एकाचा मृत्यू ; तीन जण जखमी**

या घटनेची माहिती अर्नाळा सागरी पोलिसांना मिळताच घटनास्थळी पोहचून पंचनामा सुरू केला असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

जयेश हा अर्नाळा नवापूर जवळील जांभूळपाडा या भागात राहणारा आहे. याशिवाय टेनिस क्रिकेटमध्येही जयेश हा एक सर्वोत्तम खेळाडू म्हणून नावारूपाला आला होता. या घडलेल्या हृदयद्रावक घटनेमुळे अर्नाळा परिसरात शोककळा पसरली आहे.

# ठाणे येथील सैनिकी मुलांच्या वसतिगृहात कर्मचारी भरती

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे, दि.30 :- जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, ठाणे यांच्या आधिपत्याखालील धर्मवीरनगर, नौपाडा, ठाणे (पश्चिम) येथील सैनिकी मुलांचे वसतिगृह, ठाणे आणि माजी सैनिक विश्रामगृह, ठाणे या दोन आस्थापनांवर शैक्षणिक वर्ष 2025-26 साठी माजी सैनिक प्रवर्गातून कर्मचारी भरती करण्यात येणार आहे.

वसतिगृहासाठी भरण्यात येणारे पद :-

वसतिगृह अधीक्षक (पुरुष) - 01 (माजी सैनिक JCO प्रवर्गातून),

निवासी ड्युटी, राहण्यास १ BHK निवासस्थान, वयोमर्यादा - 35 ते 55 वर्ष, शैक्षणिक पात्रता - किमान SSC पास संगणक ज्ञान, दुचाकी चालक परवाना आवश्यक, एकत्रित मासिक मानधन - रुपये 31 हजार 875/-.

विश्रामगृहासाठी भरण्यात येणारे पद :- स्वागत कक्ष सहायक - 01 (माजी सैनिक प्रवर्गातून JCO उमेदवारास प्राधान्य), अनिवासी ड्युटी, वयोमर्यादा - 35 ते 55 वर्ष, शैक्षणिक पात्रता - किमान SSC पास, संगणक ज्ञान, दुचाकी चालक परवाना आवश्यक, एकत्रित मासिक मानधन - रुपये 24 हजार 875/-.

या नियुक्ती कंत्राटी पद्धतीने अशासकीय संवर्गातून महाराष्ट्र शासन यांच्या सैनिक कल्याण विभाग, पुणे द्वारे वेळोवेळी निर्धारीत सेवा नियम तसेच एकत्रीत मानधनावर असतील. उमेदवारांनी अर्जासोबत माजी सैनिक ओळखपत्र, डिस्चार्ज बुक/सर्व्हिस पर्टीक्युलेर, शैक्षणिक प्रमाणपत्र, आधार कार्ड, पॅनकार्ड, अनुभवाचा दाखला तसेच रहिवाशी पुरावा जोडणे बंधनकारक राहील.

**अर्ज जमा करण्याचा पत्ता**

- 1) सैनिकी मुलांचे वसतिगृह ठाणे, धर्मवीरनगर, नौपाडा, ठाणे (प) - 400604 तसेच 2) जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, ठाणे, रु.नं. ४०२, कलेक्टर ऑफिस, कोर्ट नाका, ठाणे (प)-४००६०१. अर्ज जमा करण्याची शेवटची तारीख 09 जून 2025 असून निवड प्रक्रिया बुधवार दि. 11 जून 2025 रोजी सकाळी 1100 वाजता जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, ठाणे येथे घेण्यात येईल. अधिक माहितीसाठी संपर्क क्रमांक मो.9769664830 (वसतिगृह), 9246624105(अधीक्षक). यांच्याशी संपर्क साधावा, असे जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी ठाणे/पालघर मे. प्रांजळ जाधव (नि.) यांनी कळविले आहे.

# केडीएमसीच्या चौदा शाळांत सौरऊर्जेचा प्रकाश

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** - कल्याण डोंबिवली पालिकेच्या १४ शाळांमध्ये सामाजिक दायित्व निधीमधून ५० किलोवॅट क्षमतेचे सौर उर्जा निर्मिती प्रकल्प बसविण्यात आले आहेत. विविध सामाजिक संस्थांनी या प्रकल्पांसाठी सुमारे २५ लाखाचे आर्थिक योगदान दिले आहे. उर्वरित १६ शाळांमध्ये सौर उर्जा निर्मिती प्रकल्प बसविण्याची जबाबदारी एमसीएचआयच्या कल्याण शाखेने उचलली आहे.

शालेय जीवनापासून विद्यार्थ्यांना अपारंपारिक उर्जा स्त्रोतांची माहिती व्हावी. सौर उर्जा निर्मितीचे, वीज बचतीचे फायदे कळावेत हाही हे प्रकल्प शाळेमध्ये बसविण्या मागील मुख्य उद्देश आहे, अशी माहिती या सौर उर्जा प्रकल्पांचे समन्वयक विद्युत विभागाचे कार्यकारी अभियंता प्रशांत भागवत यांनी दिली. पालिका शाळांमधील १४ सौर उर्जा प्रकल्पांचे उद्घाटन आयुक्त अभिनव गोयल यांच्या उपस्थितीत



करण्यात आले. यावेळी शहर अभियंता अनिता परदेशी, उपायुक्त संजय जाधव, उपायुक्त रमेश मिसाळ, एमसीएचआयचे सचिव मिलिंद चव्हाण, कार्यकारी अभियंता प्रशांत भागवत, शिक्षणाधिकारी विजय सरकटे उपस्थित होते.

लहान सौर उर्जा प्रकल्प हे मोठ्या सौर उर्जा प्रकल्पांइतकेत महत्वाचे आहेत. त्यामुळे असे प्रकल्प बसविण्यासाठी प्रत्येक संस्था, सामाजिक संस्था, आस्थापना यांनीही पुढाकार घेतला पाहिजे. अपारंपारिक उर्जा स्त्रोतांचा प्रचार आणि प्रसार होण्यासाठी असे स्थानिक पातळीवरील सौर उर्जा प्रकल्प खूप महत्वाचे आहेत, असे आयुक्त गोयल यांनी सांगितले.

केंद्र, राज्य सरकारच्या पुढाकारातून सौर उर्जा निर्मिती घराघरात पोहचेल यादृष्टीने शासन पातळीवर प्रयत्न केले जात आहेत. पारंपारिक उर्जा स्त्रोतांची उपलब्धता पाहता सौर उर्जा निर्मितीसाठी केंद्र सरकारने एक लक्ष्य निर्धारित केले आहे, देशाचा प्रत्येक परिसर जोपर्यंत या उपक्रमात सहभागी होत नाही, तोपर्यंत सरकारला आपले लक्ष्य गाठणे शक्य होणार नाही. त्यामुळे प्रत्येक संस्थेने अशा प्रकल्पांसाठी खारीचा वाटा उचलला पाहिजे, असे आयुक्तांनी सांगितले.

कल्याण डोंबिवली पालिकेच्या १४ शाळांमध्ये हे प्रकल्प उभारणीसाठी रिजन्सी ग्रुप, वैष्णवी बिल्डकॉन, कल्याण रनर्स ग्रुप, रोटरी क्लब न्यू कल्याण, मोहन खेडा ग्रुप, स्वामी नारायण लाईफ स्पेस, थारवानी इन्फ्रा, बिर्ला वन्या, वेस्ट पायोनिअर या बांधकाम संस्थांसह, मे. एस. एस. इलेक्ट्रिक्ल वर्कस, त्रिमूर्ती एन्टरप्रायझेस, टॉप इलेक्ट्रिकल, नेहल प्रॉपर्टी, रॉयल इलेक्ट्रिकल, आशीर्वाद इलेक्ट्रिकल, मल्हार, तुषार इलेक्ट्रिकल, कल्याण इव्हेन्टस, के. बी. इलेक्ट्रिकल कंपन्यांनी आर्थिक योगदान दिले आहे.

# अंबरनाथच्या औद्योगिक क्षेत्राला स्वच्छतेचा कर !



### उद्योजक संघटना - नगर व पालिका बैठकीत एकमत

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**अंबरनाथ :** अंबरनाथच्या औद्योगिक वसाहतीमध्ये रस्त्यांची दुरावस्था असून अनेक ठिकाणी पथदिवे बंद आहेत. यासह विविध समस्यांवर अंबरनाथ नगरपालिकेच्या मुख्याधिकाऱ्यांशी अंबरनाथ शहरातील उद्योजकांच्या संघटनेने नुकतीच चर्चा केली. या चर्चेअंती अंबरनाथच्या औद्योगिक क्षेत्रालाही यापुढे स्वच्छता कर लावण्यावर एकमत झाले. पालिकेने सहा महिने स्वच्छता केल्यास उद्योजकही कर भरण्यास तयार होतील, अशी आशा उद्योजक संघटनेच्या वतीने व्यक्त करण्यात आली.

अंबरनाथ शहर हे मोठे ओद्योगिक शहर आहे. तीन वेगवेगळ्या औद्योगिक क्षेत्रात विभागलेले येथील औद्योगिक क्षेत्र हे राज्यातील सर्वात मोठ्या औद्योगिक क्षेत्रांच्या यादीत मोडते. अंबरनाथ पश्चिमेतील वडोल आणि मोरिवली औद्योगिक क्षेत्रात पथदिवे बंद, खराब रस्ते या समस्या आहेत. तर आनंद नगरच्या अतिरिक्त औद्योगिक वसाहतीतही या समस्या आहेत. तरीही औद्योगिक क्षेत्रातून सुमारे ३० कोटी रूपये कररूपात अंबरनाथ नगरपालिकेच्या तिजोरीत जमा होतात. समस्या कायम असताना कर आकारणी मात्र सुरूच असल्याने उद्योजकांमध्ये नाराजी होती. त्यामुळे उद्योजकांची संघटना असलेल्या ॲडिशनल अंबरनाथ मॅन्युफॅक्चरर असोसिएशन (आमा) आणि काही उद्योजकांशी अंबरनाथ नगरपालिकेचे मुख्याधिकारी उमाकांत गायकवाड यांनी विशेष बैठकीत संवाद साधला.

या बैठकीत औद्योगिक क्षेत्रातील विविध समस्या मांडण्यात आल्या. यात प्रामुख्याने मोरिवली आणि वडोल येथील रस्त्यांची दुरावस्था, बंद असलेले पथदिवे आणि औद्योगिक क्षेत्रात वाढलेले अतिक्रमण या मुद्द्यांवर उद्योजकांनी पालिका प्रशासनाचे लक्ष वेधले. पालिका प्रशासन औद्योगिक क्षेत्रातील घनकचरा उचलण्याबाबत पालिका प्रशासन दुर्लक्ष करत असल्याची तक्रारही उद्योजकांनी केली. त्यावर बोलताना मुख्याधिकारी उमाकांत गायकवाड यांनी औद्योगिक क्षेत्रातील पथदिवे अखंडीत सुरू राहण्यासाठी आणि अतिक्रमणांवर कारवाई करण्यासाठी संबंधित विभागांना कार्यवाहीचे आदेश दिले.

# वसईतील वृक्ष गणना रखडली

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**वसईः** वृक्षांची स्थिती माहीत व्हावी यासाठी दर पाच वर्षांनी वृक्ष गणना केली जाते. मात्र २०१६ नंतर वसई विरार शहरातील वृक्षांची गणनाच झाली नसल्याचे समोर आले. त्यामुळे पालिकेने वृक्ष गणनेकडे पाठ फिरवली असल्याचे चित्र दिसून येत आहे. तर वृक्ष गणना करण्यासाठी काढण्यात आलेल्या निविदेला ही प्रतिसाद मिळाला नसल्याने ही वृक्ष गणना रखडली आहे. वसई-विरार शहराचे झपाटयाने नागरीकरण वाढू लागले आहे. यामुळे काही ठिकाणी वृक्षतोडही केली जाऊ लागली आहे. शहरातील वनीकरणाचा पट्टा वाढावा व पर्यावरणाचा समतोल राखला जावा यासाठी पालिकेकडून वृक्षारोपणासारखे विविध उपक्रम राबविले जात आहेत परंतु शहरात असलेल्या वृक्षांची माहिती पालिकेला मिळावी यासाठी वृक्ष गणना ही होणे गरजेचे आहे. यामुळे शहरातील वृक्षांची आकडेवारी व माहिती समोर येत असते. यापूर्वी पालिकेने २०१६ मध्ये वृक्ष गणना केली होती. त्यावेळी पालिकेच्या कार्यक्षेत्रात १४ लाख ४२५ वृक्षांची नोंद करण्यात आली होती. मात्र त्यानंतर पुन्हा वृक्ष गणनाच झाली नसल्याचे समोर आले आहे. वृक्ष गणना करण्यासाठी पालिकेने २०२४ मध्ये निविदा ही काढली होती. या निविदेत दोन ते तीन ठेकेदार पुढे आले होते मात्र तांत्रिक अडचणीमुळे त्यांनी ही त्याकडे पाठ फिरवली. त्यामुळे नऊ वर्षे झाली तरीही अजूनही शहरातील वृक्ष गणना होऊ शकली नाही. त्यामुळे शहरात एकूण किती वृक्ष आहेत व किती वृक्षांची कत्तल झाली याची माहिती पुढे येऊ शकली नाहीनिविदेला ही हव्या त्या प्रमाणात प्रतिसाद मिळाला नसल्याने वृक्ष गणना झाली नाही असे वृक्ष प्राधिकरण विभागाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले आहे. आता वृक्ष गणना व्हावी यासाठीची प्रक्रिया सुरूच आहे असेही त्यांनी आहे.

# शहापूरच्या पाणी योजनेला आता जूनचा मुहूर्त ?



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**शहापूर :** शहापूर शहराचे वाढते नागरिकीकरण लक्षात घेता शहापूर नगरपंचायतीसाठी शासनाने ४० कोटींच्या नवीन योजनेला हिरवा कंदील दिला आहे. येत्या जून महिन्यात ह्या योजनेला मंजुरी मिळणार असल्याचे आश्वासन पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांनी शहापूरच्या शिवसेनेच्या शिष्टमंडळाला सह्याद्री अतिथी गृहात पार पडलेल्या चर्चेत दिले. वाढत्या लोकसंख्येमुळे उपलब्ध असलेल्या पाणीपुरवठा योजनेतून सद्यस्थितीत स्थानिक रहिवाश्यांना पुरेसे पाणी मिळत नसल्याने शहापूर शहराला स्वच्छ व मुबलक पाणी मिळावे यासाठी गेल्या ७ वर्षांपासून शिवसेनेचे नेते प्रकाश पाटील, ग्रामीणचे जिल्हाप्रमुख मारुती धिर्डे व शहापूर शहरप्रमुख विजय भगत यांच्यासह स्थानिक पदाधिकारी शहापूर नगरपंचायतीला नवीन पाणीपुरवठा योजना मंजूर होऊन मुबलक पाणी मिळावे यासाठी राज्य शासनाकडे पाठपुरावा सुरू केला होता.

शहापूरला ग्रामपंचायत असताना १९८३ साली माणसी ४० लिटर पाणी वाटप गृहीत धरून योजना बनविण्यात आली होती २०११ च्या जनगणनेनुसार तेव्हा ११ हजार लोकसंख्या होती ती लोकसंख्या आता २५ हजाराच्या आसपास गेली असल्याने सद्याचा पाणीपुरवठा अपुरा पडत आहे. या योजनेला आता ४२ वर्षं झाली असून या योजनेतील पाईपलाईनला गळती व नादुरूस्ती यासारख्या अनेक तांत्रिक त्रुटी निर्माण होत आहे. ही योजना कालबाह्य झाल्याने व शहापूर शहराची लोकसंख्या दिवसेंदिवस वाढत असून नागरिकीकरण होत आहे. दरम्यान शहापूर शहरासाठी ४० कोटींच्या योजनेला मंजुरी देण्यात आली असून, २०५४ पर्यंतची ५८ हजार लोकसंख्या लक्षात घेऊन माणसी १३५ लिटर पाणी मिळेल, असे नियोजन करण्यात आले आहे. योजनेतून शहापूरकरांना दररोज १०,१५ द.ल. लिटर पाणी मिळणार असल्याने येथील नागरिकांना कायमस्वरूपी मुबलक पाणी मिळणार असल्याने समाधान व्यक्त होत आहे.

# कल्याण पंचायत समिती कृषी विभागातर्फे पन्नास टक्के अनुदानावर शंभर क्विंटल बियाणे उपलब्ध

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** पावसाला सुरुवात होताच बळीराजाला पेरणीचे वेध लागतात, अशा वेळी त्यांना खात्रीशीर व उगवण क्षमता चांगली असणारे बियाणे मिळणे आवश्यक असते, यामुळेच जिल्हा परिषदेच्या कृषी विभागाच्या वतीने प्रत्येक पंचायत समित्यांना बियाणे पुरविण्यात आले आहे, त्यानुसार कल्याण पंचायत समितीच्या कृषी विभागाकडे सुमारे १००क्विंटल भात बियाणे उपलब्ध झाले असून ते ५० टक्के अनुदानावर आहे, यांचे वाटप सोमवार दि २/६/२०२५ पासून कल्याण पंचायत समिती येथे होणार आहे, यासाठी आधारकार्ड, फारर्मर आयडी, आणि ७/१२ इत्यादी कागदपत्रे आवश्यक असून याचा तालुक्यातील शेतक-यांनी लाभ घ्यावा असे आवाहन कल्याण पंचायत समितीचे गटविकास अधिकारी संजय भोये यांनी केले आहे.

कल्याण तालुक्यात २९ हजार ७९४:९२ हेक्टर भोगोलिक क्षेत्र आहे. तर एकूण लागवडीखालील क्षेत्र ८ हजार २७२ ऐवढे आहे. यामध्ये भात पिकाखालील क्षेत्र ४ हजार३६९ इतके आहे. यातही हळवे भात क्षेत्र१७३८ हेक्टर, निमगरवे भातक्षेत्र १५०० हेक्टर, व गावे भात क्षेत्र १२०० हेक्टर, असे खरिप पिकाखालील एकूण क्षेत्र ४ हजार ४३८ हेक्टर आहे.

त्यासाठी खरीप हंगाम सन २०२५ मध्ये जिल्हा योजना सेस अंतर्गत ५० टक्के अनुदानावर सुमारे १००क्विंटल भात बियाणे आले आहे, यामध्ये कर्जत-३,२०क्विंटल, कर्जत ५,१० क्विंटल, कर्जत २,१० क्विंटल, आणि जया ६० क्विंटल चार समावेश आहे. या शिवाय तालुक्यात परवाना धारक बियाणे विक्रेते८असून त्याच्याकडे खाजगी कंपनीचे३०जातीचे एकूण४३१.९६क्विंटल उपलब्ध झाले आहे.



# बल्याणीतील शाळेची भिंत कोसळून ११ वर्षाच्या मुलाचा मृत्यू

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : केडीएमसी हद्दीतील अ प्रभाग क्षेत्रातील बल्याणी परिसरातील केबीके इंटरनॅशनल खाजगी शाळेची भिंत कोसळल्याच्या घटनेत एका लहान मुलाचा मृत्यु तर दोन लहान मुले गंभीर जखमी झाल्याची दुर्दैवी घटना शुक्रवारी घडल्याने परिसरात एकच हळहळ व्यक्त होत आहे. यानिमित्ताने खाजगी शाळा बांधकाम प्रश्न ऐरणीवर आला असल्याचे दिसत आहे.

प्राप्त माहिती नुसार टिटवाळा ग्रामीण पोलिस



स्टेशनच्या हद्दीतील बल्याणी परिसरातील एस के नगर जवळील केबीके इंटरनॅशनल् या खाजगी शाळेची संरक्षक भिंत शुक्रवारी संध्याकाळी चार वाजण्याच्या सुमारास धोकादायक झालेली भिंत कोसळल्याच्या घटनेत शेजारील श्री कृपा चाळ परिसरातील लहान मुले खेळत होती. त्यापैकी अंशुकुमार सिंह 11वर्षीय चिमुकल्याचा दुर्दैवी मृत्यु झाला. तसेच 10वर्षीय मुलगा अभिषेक साहानी, आणि 6 वर्षीय शोएब शेख हे गंभीर जखमी झाले. दोन्ही मुलावर रूग्णालयात उपचार सुरू असून घटनेत अंशुकुमार सिंह याचा दुर्दैवी मृत्यु झाल्याचे रूक्मिणीबाई रूग्णालयातील डॉक्टरांनी घोषित केले.

या घटनेने बल्याणी परिसरातील केबिके शाळेजवळील चाळ परिसरात शोककळा पसरली. स्थानिक चाळकरी रहिवाशांनी यानिमित्ताने आरोप केला की, केबिके शाळेची संरक्षण भिंत धोकादायक झाली होती. या बाबत शाळाप्रशासनाला तक्रार केली होती. मात्र शाळा प्रशासनाने थातुरमातुर डागडुजी करीत दुर्लक्ष केल्याने ही घटना घडली. या घटनेने खाजगी शाळा इमारत बांधकाम, संरक्षण भिंत प्रश्न ऐरणीवर आला आहे.

# शहापूर येथे अंनिसचे प्रशिक्षण संपन्न




दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

शहापूर : महाराष्ट्र अंनिस शाखा शहापूर आयोजित कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिर नुकतेच म .ना.बरोरा विद्यालयात संपन्न झाले. शिबिरात एकुण पन्नास प्रशिक्षणार्थी उपस्थित होते. शिबिरामध्ये अंनिसची कार्य करण्याची पद्धत म्हणजेच पंचसूत्री जिल्हा प्रधान सचिव राजेश देवरुखकर यांनी उपस्थितासमोर मांडली. अंनिसची व्यापक वैचारिक भूमिका थोडक्यात राज्य सल्लागार सुशीला मुंडे यांनी विशद केली. वैज्ञानिक दृष्टिकोन का बाळगावा आणि तो आपल्या देशात का रुजला नाही याची कारणमीमांसा जिल्हा कार्याध्यक्ष डॉ.सुषमा बसवंत यांनी केली. या मान्यवरांनी प्रोजेक्टरचे सहाय्याने पिपिटी प्रेझेंटेशन करुन विचार मांडले. राज्य सल्लागार प्रा.मच्छिंद्रनाथ मुंडे यांनी मनातील ओळखणे, हवेतून पैशाच्या नोटा काढून दाखवणे, डोळे बंद करुन वस्तुंचा रंग ओळखणे ई.चमत्कार दाखवून, मन व मनाचे आजार यावर विस्तृत मार्गदर्शन केले. अंनिसच्या राज्य कायदा सहकार्यवाह एड.तृप्ती पाटील व जिल्हा प्रशिक्षण कार्यवाह किशोर पाटील यांची विशेष उपस्थिती शिबिरासाठी लाभली.सर्व प्रशिक्षणार्थी यांना उपस्थिती प्रमाणपत्रासोबतच जादूटोणा विरोधी कायद्याची पुस्तिका विनामुल्य देण्यांत आली. शिबिरासाठी महिलांची उपस्थिती ही चांगली होती. साधना भेरे,शहापूर शाखा समन्वयक यांनी सुत्र संचालन व सर्वांचे स्वागत केले.शिबिराचे उद्घाटन अंनिसचे जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते रमेश वनारसे यांनी रिमोटद्वारे मेणबत्ती प्रज्वलित करून केले. निखिल लांडगे शहापूर शाखा प्रधान सचिव यांनी शिबिरासाठी विद्यालयातील वर्ग विनामुल्य उपलब्ध करून दिल्याबद्दल जनकल्याण संस्थेचे आभार मानले. तसेच माजी नगरसेवक विनोद भोईर यांनी शिबिरासाठी आर्थिक साहाय्य केल्याबद्दल त्यांचेही आभार मानून,शहापूर शाखेच्या आवाहनाला प्रतिसाद देऊन,उपस्थित राहिलेल्या सर्वांचे व मार्गदर्शन केलेल्या वक्त्यांचे आभार मानले. राज डिंगोरे , कार्याध्यक्ष शहापूर शाखा, सल्लागार संजय कांबळे, निखिल धनगर, कमलाकर भोईर या सर्वांनी विशेष मेहनत घेऊन शिबिर यशस्वी केले. त्यांचेही आभार मानुन कार्यक्रमाची समाप्ती "हम होंगे कामयाब " या गीताच्या सामुदायिक गायनाने झाली.

# 'आय' प्रभागातील रखडलेल्या रस्त्याचे काम सुरु

## अडथळ्यांवर निष्कासन कारवाई

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या आय प्रभागात गेल्या दोन वर्षांपासून रखडलेले रस्ता रुंदीकरण व गटारीचे काम अखेर गुरुवारी सुरू करण्यात आले. अतिरिक्त आयुक्त योगेश गोडसे आणि उपायुक्त अवधूत तावडे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक आयुक्त भारत पवार यांच्या पथकाने या कामास सुरुवात केली.

काम सुरू करताना माणेरे गावातील काही गाळेधारक आणि स्थानिक नागरिकांकडून कामात अडथळा निर्माण करण्यात आला. संबंधित भागात तणावाची स्थिती निर्माण झाली होती. पोलीस प्रशासनाने परिस्थिती शांत ठेवण्याचा प्रयत्न





केला, महापालिकेतील कर्मचाऱ्यांनी परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेता, तसेच मागील कृष्णानगरी चाळीमध्ये पावसाचे पाणी शिरू नये म्हणून महापालिकेने तात्काळ ११ गाळेधारकांवर निष्कासन कारवाई केली. यामध्ये अनधिकृत शेड, ओटे आणि अडथळा निर्माण करणारे साहित्य काढून टाकण्यात आले. त्यानंतर वादग्रस्त ठिकाणी जुनी गटार व्यवस्था शोधून काढण्यात आली आणि ती मुख्य नाल्याशी मार्किंगनुसार जोडण्यात आली.

निष्कासन कारवाईनंतर रस्ता रुंदीकरण व गटारीचे काम त्वरित सुरू करण्यात आले असून. नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने संबंधित भागात रेडियम पट्ट्या व 'डेंजर' अशी चिन्हे लावण्यात आलेली आहेत. महापालिकेच्या या तातडीच्या आणि ठोस कारवाईमुळे गेली अनेक महिने रखडलेले महत्त्वाचे काम मार्गी लागले असून, लवकरच परिसरातील नागरिकांना सुधारित रस्ता आणि सांडपाणी निचरा सुविधांचा लाभ मिळणार आहे.

प.पू.स. रमणनाथजी महाराज संजीवन समाधी ट्रस्ट



आदर्श शिष्य होणं हे मोठं कठीण काम असतं. शिष्याला आपलं स्वत्त्व विसरून गुरुचरणी लीन व्हावं लागतं. आपलं आयुष्य गुरूंच्या चरणी समर्पित करावं लागतं. गुरूंनी सांगितलेली प्रत्येक गोष्ट शिष्याला शिरसावंद्य असावी लागते. गुरू सहजासहजी प्रसन्न होत नसतात. शिष्याला आपल्या वागणुकीनं, कृतीनं गुरूंना प्रसन्न करून घ्यावं लागतं. शिष्याच्या बारीकसारीक कृतींमधून गुरूंविषयी निष्ठा व्यक्त होत असते.एकाच वेळी गुरू व परमेश्वर दोघंही समोर उभे ठाकले असता कुणाचे पाय धरावेत, असा प्रश्न शिष्याला पडला तेव्हा तो गुरूंच्या पायांवर प्रथम नतमस्तक झाला. याबाबत त्याला विचारलं असता तो म्हणाला : 'प्रथम मी गुरूंच्या पाया पडलो. कारण, त्यांचाच कृपेमुळे आज साक्षात् परमेश्वराचं दर्शन मला घडलं.' शिष्यानं या ठिकाणी देवापेक्षाही गुरूंचं स्थान श्रेष्ठ मानलं आहे. गुरूंना कायमच चांगला शिष्य घडवण्याची तळमळ असते.

# तापमानाची वाढ कमी करायची असेल तर हरित पट्टे वाढविणे गरजेचे

## - कृषी मुल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

टिटवाळा : तापमानाची वाढ दिवसांन दिवस वाढतच चालली आहे, ती वाढ कमी करण्यासाठी हरित पटे तयार करणे गरजेचे आहे असे प्रतिपादन मुल्ला आयोग समितीचे अध्यक्ष पाशा पटेल यांनी टिटवाळा येथे केले आहे,

महाराष्ट्र शासन व ठाणे जिल्हा अधिकारी, तसेच शासनाच्या धोरणानुसार वनपटे तसेच खाजगी जागेवर बांबूची लागवड करावी या उद्देनाने कल्याण तालुक्यातील टिटवाळा येथे बांबू लागवड मेळावा आयोजित करण्यात आला होता,

उपस्थित पाहुणे यांच्या हस्ते महापुरुषांच्या प्रतिमेचे पूजन करून व दिप प्रजोलीत करून कायैक्रमाचे उदघाटन करण्यात आले, त्या नंतर उपस्थित पाहुणे याचा सन्मान करण्यात आला,बांबू लागवड मेळाव्याला कृषी मुल्य आयोग समितीचे अध्यक्ष पाशा पटेल, श्रमीजीवी संघटना महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष रामभाऊ वारणा,प्रदेश सरचिटणीस बाळाराम भोईर, संघटनेचे जिल्हा अध्यक्ष



अशोक सपाटे,जिल्हा सरचिटणीस राजेश चन्ने, नायब तहसीलदार सत्यजित चव्हाण, कृषी विभागाचे कुमार जाधव, वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुरेश कदम,साळसकर मॅडम, मंडळ अधिकारी चेतन पष्टे, श्रमीजीवी संघटना तालुका अध्यक्ष विष्णु वाघे, माजी उपमहापौर बुधाराम सरनोबत, कल्याण वन अधिकारी शिंदे यांच्या सह शेतकरी, विविध विभागातील अधिकारी व श्रमीजीवी संघटनेचे पदधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.यावेळी कृषी मुल्य आयोग समितीचे अध्यक्ष पाशा पटेल यांनी सांगितले की शंभर वषौत एवढी कधीही गरमी जाणवत नव्हती तेवढि गरमी यावषी पडली होती,याचा अथै हरित पटे कमी झाले आहेत, म्हणून शासनाने हरित पटे लागवड उपक्रम सुरू केले आहेत, बांबू लागवड अशी आहे कि अती जलद वाढ होते,व उंच जास्त होतो, बांबू पासून विविध वस्तू तयार करता येतात, माणसाला वषौला 280किलो ऑविसीजन लागतो बांबूचा झाड 320किलो ऑविसीजन देतो,तसेच35टक्के कॉबैन ऑकसाईड खातो ,बांबूच्या झाडापासून अनेक फायदे आहेत,शासनाकडून अनुदान मिळतो ठाणे जिल्ह्यातील बांबू लागवड करावी यासाठी मेळावे सुरू आहेत असे सांगितले,

# दुषित पाणीपुरवठा : नागरिकांचे आरोग्य धोक्यात | पेण महापालिकेचे दुर्लक्ष

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण: पेण शहरात दिवसेंदिवस दूषित पाणीपुरवठा होत असल्यामुळे अनेक आजारांना बळी पडताना नागरिक दिसत आहेत. गेली आठ दिवस अवकाळी पावसाने हाहाकार माजल्यामुळे जे हेटवणे धरणातून मूळ पाणी पिण्यासाठी पेण नगरपालिकाला येत आहे ते मात्र गढूळ घाण युक्त पाणी आता सद्यस्थितीला येत असल्याकारणामुळे पेणकरांची समस्या वाढली आहे.

पेण शहरातील समस्या दिवसेंदिवस वाढत जात असून खराब पाणी, खराब रस्ते,



फेरीवाले, ट्रॅफिक समस्या, पार्किंगचे शुन्य नियोजन पेण शहरामध्ये मोठया प्रमाणात तयार होणाऱ्या नवीन इमारती,आरक्षण,नवीन गाळे जागोजागी उभारलेले आहेत यात अधिकृत अनधिकृत किती याची माहिती नाही,शहरात शहरीकरण वाढत असता अपु-या सोयी मग अगोदरच्या स्थानिक लोकांच्या नियोजनाचे काय ही सर्व जबाबदारी पेण नगरपरिषद यांची असल्याने त्यातच प्रशासक लागले असल्याने खरी जबाबदारी मुख्याधिकारी यांची आहे.

जुना पेट्रोल पंप ते आर. टी. ओ,दातार अळी बोरगाव रोड, तसेच शहरातील अंतर्गत रस्ते खड्डयात गेले आहेत. रायगड बाजार बायपास ते चिंचपाडा रस्त्याची दैनावस्था करून ठेवली आहे. पेण प्रायव्हेट हायस्कूल कडे जाणारा अर्धवट स्थितीत असून एक दोन आठवड्यामध्ये शाळा सुरू होणार असून विद्यार्थी शिक्षक पालक यांच्या नाकीनऊ येणार आहेत. पेण नगरपालिकेचे मुख्य अधिकारी यांनी सदरच्या पेण शहरातील समस्या सोडविण्यासाठी आपल्या कर्मचारी यांना कामाला लावले पाहिजे.१५ दिवसांपूर्वी विज मंडळाकडून झाडाच्या फांद्या तोडल्या पण आजही चिंचपाडा परिसरात झाडाचा पालापाचोळा कुजला, गटारात गेला गटारे भरली गटारे तुंबली पाणी वरून गेले तरीही ती घाण काढली नाही यामुळे सारखी दुर्गंधी येत आहे.परिणामी या पेण करांच्या समस्या वेळेवर सोडवल्या नाहीत तर याची तक्रार, नगरविकास मंत्री, उपमुख्यमंत्री, मुख्यमंत्री यांच्याकडे नक्की केली जाणार असे नागरिकांनी सांगितले. याबाबत पेण नगरपरिषद मुख्याधिकारी जीवन पाटील यांच्याशी संपर्क केला असता ते संपर्क क्षेत्राच्या बाहेर होते त्यामुळे संपर्क होऊ शकला नाही.

# मुरबाड पंचायत समिती कृषी विभागातर्फे ५०% टक्के अनुदानाने भात बियाणे मिळणार!

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड(बाळासाहेब भालेराव) : पंचायत समिती मुरबाड येथे जिल्हा परिषद सेस योजना सन २०२५/२६ अंतर्गत ५० टक्के अनुदानाने भात बियाणे मिळणार आहे कर्जत-३(वाटाणा) ७२ क्विंटल, (MTU) एम टी यु १०१०,,१०० क्विंटल भात प्राप्त झालेला आहे. (पॅकिंग साइज,२५ किलोची आहे)

जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी ५० टक्के अनुदानाने भात बियाणे वाटपाचा लाभ घ्यावा असे आव्हान मुरबाड पंचायत समिती गटविकास अधिकारी डॉ. लता गायकवाड, सहाय्यक गटविकास अधिकारी चिंतामण लोहकरे, पंचायत समिती कृषी अधिकारी रणजित जाधव, विस्ताराधिकारी कृषी, रवींद्र चौधरी यांच्यामार्फत करण्यात आले आहे.



वैद्यकीय आरोग्य विभागामार्फत कॅन्सर तपासणी शिबिराचे आयोजन अवचित पाडा नागरी आरोग्य केंद्र येथे करण्यात आले आहे. या शिबिराचे उद्घाटन उद्या दिनांक ३०.०५.२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता मा प्रशासक तथा आयुक्त श्री अनमोल सागर यांचे हस्ते होणार आहे. तरी आपण सर्वांनी उपस्थित राहावे ही विनंती.



मुरबाड तालुक्यातील इतर जिल्हा मार्गामध्ये समावेश असलेल्या 111 टोकावडे करचोंडे चासोळे जडई आंबिवली तळेगाव या रस्त्यावरील कनक वीरा नदीवरील पुलाचा वळण रस्ता चुकीच्या पद्धतीने बांधल्याने मोठी अवजड वाहने उदाहरणार्थ बस वळण घेता येत नाही त्यामुळे हा वळण रस्ता योग्य पद्धतीने बांधावा अशी मागणी वाहन चालक करीत आहेत.

# पेण येथे शिक्षक प्रशिक्षण शिबीर संपन्न

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था पनवेल आणि पेण पंचायत समिती यांच्या संयुक्त विद्यमाने वरिष्ठ वेतन श्रेणी व निवड श्रेणी जिल्हास्तरीय प्रशिक्षण पेण प्रायव्हेट हायस्कूल येथे जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था पनवेलचे प्राचार्य इनामदार साहेब आणि पेण पंचायत समितीच्या गटशिक्षणाधिकारी शर्मिला शेंडे यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाले.

ज्या प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांचे बारा वर्षे पूर्ण होतात अशा शिक्षकांसाठी वरिष्ठ श्रेणी तर 24 वर्षे पूर्ण झालेल्या शिक्षकांसाठी निवड श्रेणीचे प्रशिक्षण 26 मे ते 29 मे या चार दिवसाच्या कालावधीत निवड श्रेणीकरिता सुलभक जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था पनवेल चे अधिव्याख्याते श्री .दौंडसर ज्येष्ठ अधिव्याख्याता सागर तुपे तर वरिष्ठ वेतनश्रेणी करीता सुलभक ज्येष्ठ अधिवेक्यता कामशेट्टी सर ज्येष्ठ अधिव्याख्याता रामदास टोणे. चार दिवस विविध प्रकारच्या मार्गदर्शनांमधून वरिष्ठ वेतनश्रेणी व निवड श्रेणी करता ज्या प्रशिक्षणाची गरज असते अशा प्रकारचे जिल्हास्तरीय प्रशिक्षण नुकतेच संपन्न झाले या प्रशिक्षणासाठी वरिष्ठ वेतनश्रेणीकरता 33 प्रशिक्षणार्थी तर निवड श्रेणी करिता 39 प्रशिक्षणार्थी अशा 72 प्राथमिक माध्यमिक शिक्षकांनी जिल्हास्तरीय शिक्षण प्रशिक्षण पूर्ण केले. या चार दिवसांमध्ये अगदी नियोजनबद्ध कार्यक्रम साधनव्यक्ती श्री मानकवले सर यांनी उत्तम प्रकारे केले.

रायगड जिल्ह्यातील प्रत्येक तालुका स्तरावर 2 जून ते 11 जून दरम्यान वरिष्ठ वेतनश्रेणी करता 10 केंद्र तर निवड श्रेणी करता 11 केंद्र जिल्ह्यात सुरू होणार असल्याची माहितीही यावेळी देण्यात आली.

# आ. विश्वनाथ भोईर यांच्याकडून मोफत दाखले वाटप शिबिराचे आयोजन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण(शरद शहाणे) : कल्याण पश्चिम येथील उंबर्डे गावात शिवसेना आमदार विश्वनाथ आत्माराम भोईर यांनी मोफत शासकीय दाखले वाटपाचे दोन दिवसीय शिबिर आयोजित केले होते. नुकतेच दहावी बारावीचे निकाल लागल्याने विद्यार्थ्यांना महाविद्यालयात प्रवेश घेण्यासाठी वेगवेगळ्या प्रकारचे शासकीय शैक्षणिक दाखले एकाच छत्राखाली सर्व प्रकारचे दाखले सुलभ मिळावेत म्हणून आमदार भोईर यांनी मोफत दाखले वाटप शिबिर आयोजित



केले होते जेणेकरून कुठल्याही विद्यार्थ्यांला महाविद्यालयीन प्रवेश घेण्यासाठी अडचण होऊ नये. दरम्यान या कार्यक्रमात माझी नगरसेवक जयवंत भोईर, वैभव विश्वनाथ भोईर आणि अनेक कार्यकर्ते उपस्थित होते. या शिबिराचा लाभ अनेक विद्यार्थ्यांनी घेतला शिबिर यशस्वी च्या पार पडण्याकरिता अनेक कार्यकर्त्यांनी मेहनत घेतली.

जीवनदीप शैक्षणिक संस्था पोई, संचलित
सौ.कमलताई किसन कथोरे कॉलेज, म्हसा मुंबई विद्यापीठाशी संलग्न
ADMISSION OPEN 2025-26
११ वी व १२ वी
ARTS, COMMERCE, SCIENCE
UNDER GRADUATE: B.A., B.Com., B.Sc. CHEMISTRY, B.Sc. MATHS, BAF, BMS
POST GRADUATE: M.Sc. CHEMISTRY, M.Com. ADVANCED ACCOUNTANCY, M.A. MARATHI, M.A. ECONOMICS, M.A. SOCIOLOGY, M.A. HISTORY




7038658191
9130580111

जीवनदीप शैक्षणिक संस्था,पोई संचलित
जीवनदीप कौशल्य विकास केंद्र गोवेली
कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग संचलित
प्रवेश सुरु! प्रवेश सुरु! प्रवेश सुरु!

| | | |
|---|---|---|
| १ | बांधकाम पर्यवेक्षक (कोड नं.३०४२०२) | कालावधी १ वर्ष |
| २ | पॅथोलॉजी टेक्नीशियन (कोड नं.२०१२३०) | कालावधी १ वर्ष |
| ३ | जनरल नर्सिंग आणि मिडवाइफरी असिस्टंट (GNMA) (कोड नं.२०१२३७) | कालावधी १ वर्ष |
| ४ | डिप्लोमा कोर्स इन मेडिकल लॅब टेक्निशियन (DMLT) (कोड नं.२०१४०४) | कालावधी २ वर्ष |
| ५ | सिक्युरिटी अॅण्ड फायर प्रिव्हिजन प्रशिक्षण (कोड नं.४११११२४) | कालावधी ६ महिने |

पात्रता : १० वी / १२ वी / पदवी
संपर्क : जीवनदीप कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गोवेली, पो.रायते, ता.कल्याण, जि.ठाणे
Call : 8108559566 / 9158518832 / 9619188558

# जिजाऊ संघटनेकडून गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड(दिलीप पवार) : महाराष्ट्रासह संपूर्ण कोकणात शिक्षण , आरोग्य, महिलासक्षमिकरण,शेती,रोजगार या पंचसुत्रीचा अवलंब करून निलेश भगवान सांबरे यांची जिजाऊ शैक्षणिक व सामाजिक संस्था उल्लेखनीय काम करत आहे.त्यांच्या लोकोपयोगी कामाचा आलेख उंचावतच चालला आहे.या वर्षी इयत्ता 10 वी आणि 12 वीच्या परिक्षेत ज्या विद्यार्थांनी उज्वल यश संपादन केले आहे अशा विद्यार्थ्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप मारावी म्हणून मुरबाड मधील गुणवंत विद्यार्थ्यांचा कौतुक सोहळा गुरूवारी कुणबी समाज सभागृह येथे



भिवंडी लोकसभेच्या लोकसभा प्रमुख मोनिकताई पानवे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला.

या विद्यार्थ्यांचा गौरव करून त्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप मारावी त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देणे हे जिजाऊ संघटनेचे काम आहे असे प्रतिपादन यावेळी मोनिकाताई पानवे यांनी केले.

यावेळी मुरबाड मधील इयत्ता 10 मध्यें प्रथम क्रमांक आलेला कु.पलक बाळू पांढरे- 96.60 %, द्वितीय कु. निल चित्तरंजन साहू-95%, व तृतिय कु. प्रथमेश तानाजी भोईर 93.45 यांच्यासह 11 विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला तर 12 वी मध्ये 1)तनुजा जयवंत तुपे-87 % 2) पारस दशरथ गायकर 82% 3)प्रिया किशोर यशवंतराव74% तर भावनादेवी भगवान सांबरे इंटरनॅशनल स्कूल झडपोली सि बि एस.सी. कु.हर्ष सुभाष पथारे 86.68 % याचा विशेष सन्मान यावेळी करण्यात आला.

कार्यक्रमासाठी जिजाऊ संघटनेचे पदाधिकारी सज्जन जमदरे,दिनेश धलपे,दशरथ राऊत, आबा हलपतराव, अतुल तेलवणे, गजानन भोईर , सौ.आश्विनी बोंबले,सौ. मुंडे यांनी विशेष मेहनत घेतली.

'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही) (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - अॅड. जयकुमार ए. रिजवानी)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८, ९०८२६६४७८१ E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024